## प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

"वनभवन" , रामगिरी रोड, पोलीस जिमखान्याजवळ, सिव्हील लाईन, नागपूर-440 001

तिसरा माळा "ए" विंग, दुरध्वनी 0712-2550670, E-mail ID pccfhoffms@gmail.com

ISO 9001:2015

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर

पहिला माळा "सी" विंग दुरध्वनी 0712-2555673/2556937 फॅक्स क्रमांक 0712-2550675

Visit us at www.mahaforest.gov.in E-mail : apccfprotection@mahaforest.gov.in


क्रमांक:- कक्ष-२५/मालकी/जनरल/प्र.क्र.१२९(१६-१७)/ ९२८ /१७-१८

नागपूर : ४४० ००१, दिनांक - ९ जुलै, २०१७

प्रति,

१. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (सर्व)

---------------

२. वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण) (सर्व)

---------------

**विषय** :- बिगर अनुसुचित वृक्ष प्रजातीमधील वृक्षांना वाहतुक परवानापासून सुट मिळणेबाबत.

**संदर्भ**:- १. शासन पत्र क्रमांक टिआरएस-०९/२०१६/प्रक्र.२४२/फ-६, दिनांक ११/०४/२०१७

२. शासन पत्र क्रमांक टिआरएस-०९/२०१६/प्रक्र.२४२/फ-६, दिनांक १२/०५/२०१७

विषयांकित प्रकरणी मा. सचिव (वने) यांच्याकडे दिनांक ११/०४/२०१७ रोजी झालेल्या साप्ताहिक बैठकीत बिगर अनुसुचित वृक्ष प्रजातीमधील वृक्षांना वाहतुक परवानापासून सुट मिळणेबाबत कॅबिनेट मंजूरी घेण्यात यावी व निर्णय घेण्यात यावा, अशा सुचना उपरोक्त संदर्भिय पत्र १ अन्वये प्राप्त असून त्या अनुषंगाने दिनांक २२ व २३/०४/२०१७ रोजीच्या वरिष्ठ वन अधिकारी यांचे परिषदेत होणा-या चर्चेनंतर कॅबिनेट नोट व अधिसुचना शासनास सादर करण्याबाबत शासन पत्र संदर्भ- २ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

सदर सूचनांना अनुसरुन उक्त परिषदेत सदर विषयावर चर्चा ठेवण्यात आली होती. तथापी त्यासंबंधाने एकमत न झाल्याने प्रकरणी वरिष्ठ वन अधिकारी व क्षेत्रीय वन अधिका-यांचे अभिप्राव घेवून निर्णय घेण्याचे सदर परिषदेत ठरले.

बिगर अनुसुचित वृक्ष प्रजातीपैकी १५ वृक्ष प्रजाती व २ वनउपजांना महाराष्ट्र राज्यात वाहतुक परवानापासून यापुर्वीच सुट दिलेली आहे. **सदर वृक्ष प्रजाती व वनउपजाची यादी सोबत सहपत्र-१ अन्वये सहप्रत्रित करण्यात येत आहे.** तथापी खाजगी मालकी क्षेत्रातील वर नमुद प्रमाणे वाहतुक परवान्यापासुन सुट दिलेल्या प्रजाती व्यतिरिक्त प्रजातीचे वाहतुकीकरीता वाहतुक परवाना घेणे अनिवार्य असल्याने खाजगी मालकी धारकांना त्यांचे शेतातील उपजाचे विल्हेवाटीकरीता अडचणी निर्माण होत असल्याने अश्या खाजगी क्षेत्रातील उपजाला वाहतुक परवानापासुन मुक्त करण्याची बाब शासनाचे विचाराधीन असल्याने उक्त परिषदेतील चर्चेत असे सुचविण्यात आले की, वनसंरक्षण व वनसंवर्धनाचे दृष्टीने महत्वाचे असलेल्या वृक्ष प्रजाती वगळता इतर प्रजाती वाहतुक परवानापासुन मुक्त करणे जास्त संयुक्तीक राहील. सदर सुचनेस अनुसरुन महाराष्ट्र वृक्ष तोडणेबाबत (विनियमन) अधिनियम-१९६४ अंतर्गत अनुसुचित प्रजाती व भारतीय वन अधिनियम-१९२७ अंतर्गत कलम ३०अन्वये शासनास प्राप्त अधिकाराखाली

संरक्षित वनक्षेत्रातील अधिसूचित राखीव प्रजाती प्राध्यान्याने विचारात घेवून वाहतुक परवानापासून इतर प्रजातींना मुक्त करण्याची बाब विचारात घेण्यात आली असुन शासन अधिसूचना दिनांक २७/११/२००१ अन्वये मराठावाडा व पश्चिम महाराष्ट्र तसेच शासन अधिसूचना दिनांक १९/१२/१९६८ अन्वये विदर्भ प्रदेशाकरीता राखीव वृक्ष प्रजाती संख्या खालीलप्रमाणे असून वृक्ष **प्रजातीनिहाय यादी सोबत प्रपत्र-२ अन्वये सहपत्रित करण्यात येत आहे.**

**राखीव वृक्ष प्रजातींचा तपशील**

| | कोकण प्रदेश | मराठावाडा व पश्चिम महाराष्ट्र | विदर्भ प्रदेश |
|---|---|---|---|
| **राखीव वृक्ष प्रजाती** | **६३** | **५२** | **४०** |

उपरोक्त नमुद अधिसूचनेप्रमाणे महाराष्ट्रातील एकुण राखीव वृक्ष प्रजाती विचारात घेता वाहतुक परवानापासून यापुर्वी सुट देण्यात आलेल्या प्रजाती व उर्वरीतपैकी १० प्रजाती कृषिक्षेत्रात देखील आढळून येत असल्याने तसेच वनसंरक्षण व वन संवर्धनाचा दृष्टीने त्यांना विशेष महत्व नसल्याने १० प्रजाती **(यादी प्रपत्र-३)** वगळता **८१ वृक्ष** प्रजातीला संरक्षण देणे वनसंरक्षणाचा दृष्टीने आवश्यक असल्याचे आढळून येते. त्यामुळे सदर ८१ वृक्ष प्रजातींना वाहतुक परवानाची आवश्यकता राहिल व अशा **प्रजातीची यादी यासोबत प्रपत्र-४** अन्वये सहपत्रित करण्यात येत आहे. सदर प्रमाणे वाहतुक परवाना आवश्यक असलेल्या प्रस्तावित ८१ वृक्ष प्रजाती वगळता उर्वरीत प्रजातीस वाहतुक परवानापासून सूट देण्याकरीता प्रस्तावित करण्याचे नियोजीत आहे.

तरी प्रकरणी बिगर अनुसुचित वृक्ष प्रजातींपैकी किती व कोणत्या प्रजातींना वाहतुक परवाना अनिवार्य करणे किंवा त्यापासुन सुट देणे संबंधाने आपले **अभिप्राय दिनांक १५/०७/२०१७** पर्यन्त न चुकता इकडील कार्यालयास कळविण्यात यावे. आपलेकडील अभिप्राय विहीत कालावधीत प्राप्त नाही झाल्यास सदर प्रस्ताव आपणाला मान्य आहे असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

सहपत्र: **प्रपत्र-१ ते ४**

अ.प्र.मु.व.सं.(संरक्षण).म.रा.नागपूर यांचेकडुन मान्य मसुदा

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण)
महाराष्ट्र राज्य **करीता**

**प्रतिलिपी:** प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)/(कार्मिक)/(उत्पादन व व्यवस्थापन)/(सामाजिक वनीकरण, पुणे), महाराष्ट्र राज्य यांना सहपत्रासह माहिती करीता सविनय सादर.

आपणांस विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमुद **प्रपत्र-४** मधील प्रजातींना संरक्षण मिळण्याचा दृष्टीने वाहतुक परवाना आवश्यक करणे प्रकरणी वृक्ष प्रजाती ठरविण्या संबंधाने आपले अभिप्राय / मार्गदर्शन होणेस विनंती आहे.

**प्रतिलिपी:** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग)/ केंद्रस्थ अधिकारी/(संधारण)/ (अकाष्ठ वनोपज)/(माहिती,तंत्रज्ञान व धोरण)/(अर्थसंकल्पय नियोजन व विकास)/(कॅम्पा) यांना सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता सस्नेह अग्रेषित.

आपणांस विनंती करण्यात येते की, वर नमुद **प्रपत्र-४** मधील वृक्ष प्रजातींना संरक्षण मिळण्याचा दृष्टीने वाहतुक परवाना आवश्यक करणे प्रकरणी वृक्ष प्रजाती ठरविण्या संबंधाने आपले अभिप्राय कळविण्यात यावेत.

अ.प्र.मु.व.सं.(संरक्षण).म.रा.नागपूर यांचेकडुन मान्य मसुदा

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण)
महाराष्ट्र राज्य **करीता**

D:\Desk-25\General\2016-17\CR.129 (16-17)T.P Examination.docx

# प्रपत्र -१

## महाराष्ट्र राज्यात आजमितीस वाहतुक परवान्यातुन सूट देण्यात आलेल्या प्रजातीचा तपशिल

| अ. क्र | वाहतुक परवाना सूट देण्यात आलेल्या वृक्ष प्रजातींचा व वनउपजाच्या तपशील | | सूट देण्यात आलेले क्षेत्र | शासन पत्र/ अधिसूचना क्रमांक व दिनाक |
|---|---|---|---|---|
| | वृक्ष प्रजातींचे नांव | वनउपजाचे नांव | | |
| १ | निलगिरी *(Eucalyotus species)* | --- | संपूर्ण महाराष्ट्र | अधिसूचना टीआरएस १०९०/ सीआर-३२/९०(iii)/एफ ६ ,दिनांक ०५/०३/१९९० |
| २ | बाभुळ *(Acacia nilotica)* | --- | संपूर्ण महाराष्ट्र | अधिसूचना टीआरएस १०९०/ सीआर-३२/९०(i)/एफ ६, दिनांक २१/०६/१९९० |
| ३ | सुबाभुळ *(Leucaena leucocephala)* | | | |
| ४ | प्रोसोपीस *(Prosopis juliflora)* | | | |
| ५ | अशोक *(Polyalthia longifolia)* | --- | संपूर्ण महाराष्ट्र | अधिसूचना टीआरएस १०९५/ सीआर-३४/एफ ६. दिनांक २३/१०/१९९७ |
| ६ | शेवगा *(Moringa oleifera)*. | | | |
| ७ | सत्रा *(Citrus reticulata)*. | | | |
| ८ | सिंदी *(Phoenix sylvestris)* | | | |
| ९ | चिकू *(Achras zapota Linn)* | | | |
| १० | भेंडी (Thespesia populanea) | | | |
| ११ | अकेसिया *(Acacia mangium)* | | | |
| १२ | पॉपलर ( Popler) | | | |
| १३ | ----- | खाजगी जमिनीवर उत्पादित लाख | भंडारा व गोंदिया जिल्हा | शासन पत्र २०१२/प्र.क्र ११८/एफ ९, दिनांक २७/०९/२०१२ |
| १४ | सुरु *(casuarina equisetifolia)* | | संपूर्ण महाराष्ट्र | अधिसूचना एस १०/सीआर २९६/एफ ३,दिनांक ०९/०४/२०१३ |
| १५ | --- | मोहफुले | संपूर्ण महाराष्ट्र | अधिसूचना क्रमांक गौणउ२०१५/प्रक्र ३५३/फ ९, दिनांक ३१/०३/२०१७ |
| १६ | वनेतर जमिनीवरील बांबुचे सर्व प्रजाती | | संपूर्ण महाराष्ट्र | अधिसूचना क्रमांक बाबुसा-२०१७ /प्र.क्र. ५९/फ ९ , दिनांक ११/०४/२०१७ |
| १७ | रबर वुड *(Hevea brasiliensis, ficus elastica)* | | संपूर्ण महाराष्ट्र | अधिसूचना क्रमांक टीआरएस. ३०३/ २०१५/प्र.क्र.८१/फ-६,दि-०४/०६/२०१५ |

D:\Desk-25\General\2016-17\CR.129 (16-17)T.P Examination.docx

## प्रपत्र-२

# महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित प्रजाती तसेच बिगर अनुसूचित राखीव प्रजातींना संरक्षण मिळण्याच्या दृष्टिने वाहतुक परवाना आवश्यक करणे बाबत

(भारतीय वन अधिनियम-१९२७ चे कलम ३० अन्वये खालील राखीव प्रजाती)

## वृक्षाची यादी.

| अ.क्र. | कोकण प्रदेश (अधिसुचना क्रमांक एस-३०/९७/प्रक्र-३९/फ-३, दिनांक २७/११/२००१) | मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र (अधिसुचना क्रमांक एस-३०/२७/प्रक्र-३९/फ-३, दिनांक २७/११/२००१) | विदर्भ प्रदेश (अधिसुचना क्रमांक एफएलडी-४६५७/१९३०६४-एफ, दिनांक १९/१२/१९६८) | महाराष्ट्र झाडे तोडणे बाबत अधिनियम (विनियमन) १९६४ अंतर्गत अनुसरुन वृक्ष प्रजाती | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | (१) ऐन (Terminalia tomentosa) | (१) ऐन (Terminalia tomentosa) | (२५) ऐन (Terminalia tomentosa) | (१०) ऐन (Terminalia tomentosa) | -- |
| २. | (३) आंबा (Mangifera indica) | (३) आंबा (Mangifera indica) | (२) आंबा (Mangifera indica) | (४) आंबा (Mangifera indica) | -- |
| ३. | (१५) बिजा (Pterocarpus marsupium) | (१५) बिजा (Pterocarpus marsupium) | (७) बिजा (Pterocarpus marsupium) | (७)बिजा (Pterocarpus marsupium) | -- |
| ४. | (२४) हळदू (Adina cordifolia) | (१४) हळदू (Adina cordifolia) | (११) हळदू (Adina cordifolia) | (८) हळदू (Adina cordifolia) | -- |
| ५. | (२५) हिरडा (Terminalia chebula) | (१३) हिरडा (Terminalia chebula) | (१२) हिरडा (Terminalia chebula) | (१) हिरडा (Terminalia chebula) | -- |
| ६. | (२७) जांभुळ (Syzijium cumini) | (२७) जांभुळ (Syzijium cumini) | (४०) जांभुळ (Syzijium cumini) | (१३) जांभुळ (Syzijium cumini) | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | (२८) खैर (Acacia catechu) | (३५) खैर (Acacia catechu) | (४१) खैर (Acacia catechu) | (५) खैर (Acacia catechu) | -- |
| ८. | (४२) महुआ, म्होवरा किंवा मह (Madhuka latifolia) | (४१) महुआ, म्होवरा किंवा मह (Madhuka latifolia) | (१९) महुआ, म्होवरा किंवा मह (Madhuka latifolia) | (३) महुआ, म्होवरा किंवा मह (Madhuka latifolia) | -- |
| ९. | (५१) साग (Tectona grandis) | (४७) साग (Tectona grandis) | (२४) साग (Tectona grandis) | (२) साग (Tectona grandis) | -- |
| १०. | (६०) तिवस (Ougeinia dalbergioides) | -- | (३१) तिवस (Ougeinia dalbergioides) | (९) तिवस (Ougeinia dalbergioides) | -- |
| ११. | (६६) चंदन (Santalum album) | (१२) चंदन (Santalum album) | (८) चंदन (Santalum album) | (६) चंदन (Santalum album) | -- |
| १२. | (६) अर्जुनसादळा (Terminalia arjuna | (४) अर्जुनसादळा (Terminalia arjuna | (१७) अर्जुनसादळा (Terminalia arjuna | (२२) अर्जुनसादळा (Terminalia arjuna | सिंधुदुर्ग जिल्हाकरीता अतिरिक्त अनुसूचित प्रजाती |
| १३. | (१२) बेहळा (Terminalia belerica) | (७) बेहळा (Terminalia belerica) | (३४) बेहळा (Terminalia belerica) | (१९) बेहळा (Terminalia belerica) | सिंधुदुर्ग जिल्हाकरीता अतिरिक्त अनुसूचित प्रजाती |
| १४. | (४३) नाना (Lagerstroemia lanceolata) | -- | -- | (१८) नाना (Lagerstroemia lanceolata) | सिंधुदुर्ग जिल्हाकरीता अतिरिक्त अनुसूचित प्रजाती |
| १५. | (५८) शिशम (Dalbergia latifolia) | (५५) शिशम (Dalbergia latifolia) | (२८) शिशम (Dalbergia latifolia) | (१६) शिशम (Dalbergia latifolia) | सिंधुदुर्ग जिल्हाकरीता अतिरिक्त अनुसूचित प्रजाती |
| १६. | (५७) शिवण (Gmelina arboria) | (५४) शिवण (Gmelina arboria) | (१६) शिवण (Gmelina arboria) | (१७) शिवण (Gmelina arboria) | सिंधुदुर्ग जिल्हाकरीता अतिरिक्त अनुसूचित प्रजाती |
| १७. | (२) अल किंवा अशी (Moringa tectoriea) | -- | -- | -- | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८. | (४) आपटा (Bohinea recimosa) | -- | -- | -- | -- |
| १९. | (५) असाना (Bridelia reclusa) | -- | -- | -- | -- |
| २०. | (७) आवळा (Filethus eamblica) | (५) आवळा (Filethus eamblica) | (३३) आवळा (Filethus eamblica) | -- | -- |
| २१. | (९) बेल (Egal marmalous) | (६) बेल (Egal marmalous) | (६) बेल (Egal marmalous) | -- | -- |
| २२ | (१०) बाहावा (Cassiea fistula) | -- | -- | -- | -- |
| २३. | (१२) भोकर (शेलुटे) (Cardiea mixa) | (९) भोकर (शेलुटे) (Cardiea mixa) | (४२) भोकर (शेलुटे) (Cardiea mixa) | -- | -- |
| २४. | (१३) भोर (जांभूळ) (Amaniea becifara) | -- | -- | -- | -- |
| २५. | (१४) बिबा (Semicarpus anacardium) | -- | (३६) बिबा (Semicarpus anacardium) | -- | -- |
| २६. | (१६) बोर (Zizifus zuzuba) | (१०) बोर (Zizifus zuzuba) | -- | -- | -- |
| २७. | (१७) चारोळी (Buchaniea letifoliea) | (१८) चारोळी (Buchaniea letifoliea) | (१) चारोळी (Buchaniea letifoliea) | -- | -- |
| २८. | (१८) चरा (Erinocarpus nimmoni) | -- | -- | -- | -- |
| २९. | (१९) चिंच (Tamarindus) | (१९) चिंच (Tamarindus) | (३९) चिंच (Tamarindus) | -- | -- |
| ३०. | (२०) धामण (Griviea Telifoniea) | (२०) धामण (Griviea Telifoniea) | -- | -- | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३१. | (२१) धावडा (Anogassias telifoliea) | (२१) धावडा (Anogassias telifoliea) | -- | -- | -- |
| ३२. | (२२) डिकेमाली Gardenia leucida | (२२) डिकेमाली Gardenia leucida | -- | -- | -- |
| ३३. | (२३) घाटबोर (Zigifus Zilofara) | (२३) घाटबोर (Zigifus Zilofara) | (९) घाटबोर (Zigifus Zilofara) | -- | -- |
| ३४ | (२६) जांबा (Zailiea zailocarfus) | (५१) जांबा (Zailiea zailocarfus) | -- | -- | -- |
| ३५ | (२८) कळंब (Stepegaini parvifoliea ) | (१७) कळंब (Stepegaini parvifoliea ) | -- | -- | -- |
| ३६. | (२९) कंडोल (कडई) (Sterculiea urenes) | (१६) कंडोल (कडई) (Sterculiea urenes) | (१०) कंडोल (कडई) (Sterculiea urenes) | -- | -- |
| ३७. | (३०) करंज (Pogamiea glebar) | (३०) करंज (Pogamiea glebar) | (१४) करंज (Pogamiea glebar) | -- | -- |
| ३८. | (३१) काजू (Anacardium oxidental) | -- | -- | -- | -- |
| ३९. | (३२) कवठ (Feroniea alefunt) | (३२) कवठ (Feroniea alefunt) | (१५) कवठ (Feroniea alefunt) | -- | -- |
| ४०. | (३४) खरसिंग (Stereospermum xylocarpum) | -- | -- | -- | -- |
| ४१. | (३५) खवस *(Sterculia colorata)* | -- | -- | -- | -- |
| ४२ | (३७) कोकम (रातांम्बी) (Garcinia indica) | -- | -- | -- | -- |
| ४३. | (३८) कुसुम (कोसिंब) Schleichera oleosa | -- | (१८) कुसुम (कोसिंब) Schleichera oleosa | -- | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४४. | (३९) कुरा (*Ixora parviflora*) | -- | -- | -- | -- |
| ४५. | (४१) मोखा (Schrebera swietenioides) | -- | -- | -- | -- |
| ४६. | (४४) ननंद्रुक (Ficus retusa) | -- | -- | -- | -- |
| ४७. | (४५) पळस (Butea frondosa (syn. Butea monosperma) | (४४) पळस (Butea frondosa (syn. Butea monosperma) | (२१) पळस (Butea frondosa (syn. Butea monosperma) | -- | -- |
| ४८. | (४६) पांढरा खैर (कांती) (Acacia feruginea) | (३६) पांढरा खैर (कांती) (Acacia feruginea) | -- | -- | |
| ४९. | (४७) पांगरा (Erythrina indica) | (४५) पांगरा (Erythrina indica) | -- | -- | -- |
| ५०. | (४८) फांसी (Dalbergia paniculata) | -- | -- | -- | -- |
| ५१. | (४९) रक्तरोहीडा (Maba nigrescene) | -- | -- | -- | -- |
| ५२. | (५०) रिठा (Sapindus emarginata) | (५०) रिठा (Sapindus emarginata) | -- | -- | -- |
| ५३. | (५२) सावर (Bombax malabarica / ceiba) | (४९) सावर (Bombax malabarica / ceiba) | (२७) सावर (Bombax malabarica / ceiba) | -- | -- |
| ५४. | (५३) शेमट (Oduba wodier syn. Lannea coromandelica) | -- | -- | -- | -- |
| ५५. | (५४) सोनखैर (लाल) (Acacia siamia) | (३३) सोनखैर (लाल) (Acacia siamia) | -- | -- | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५६. | (५५) शेंद्रि किंवा कमला (Mellotus phillipinensis) | -- | -- | -- | -- |
| ५७. | (५९) टेंभूर्णि (तेंदु) (Diospyroa melanoxylon) | (५७) टेंभुर्णि (तेंदु) (Diospyroa melanoxylon) | (३०) टेंभुर्णि (तेंदु) (Diospyroa melanoxylon) | -- | -- |
| ५८. | (६१) तेंटू (Oroxylum indicum) | -- | -- | -- | -- |
| ५९. | (६२) ताडी फ्लंट (Borasus flabellifer) | -- | -- | -- | -- |
| ६०. | (६३) ऊंबर (Ficus racemosa (syn. Ficus glomerata) | (५८) ऊंबर (Ficus racemosa (syn. Ficus glomerata) | (३८) ऊबर (Ficus racemosa (syn. Ficus glomerata) | -- | -- |
| ६१. | (६४) वड (Ficus benghalensis) | (५९) वड (Ficus benghalensis) | ((३५) वड (Ficus benghalensis) | -- | -- |
| ६२. | (६५) फणस (Artocarpus integrifolia) | -- | -- | -- | -- |
| ६३. | -- | (२४) गोरख चिंच (Adansonia digitata) | -- | -- | -- |
| ६४. | -- | (२५) हिंगन (Balanities roxburghii) | -- | -- | -- |
| ६५. | -- | (३१) कांचन (Bauhinia malabarica) | -- | -- | -- |
| ६६. | -- | (३७) कुंभा (Careya arborea) | -- | -- | -- |
| ६७. | -- | (३९) मेडसिंग (Dolichandrone falcuta) | -- | -- | -- |
| ६८. | -- | (४२) मुरमाटी (Acacia emburnea) | -- | -- | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६९. | -- | (४३) कडुलिंब (Azadirachta indica,) | ((२०) कडुलिंब (Azadirachta indica,) | -- | -- |
| ७०. | -- | (४६) पिंपळ (Ficus religiosa) | (२२) पिंपळ (Ficus religiosa) | -- | -- |
| ७१. | -- | (५२) शमी (Prosopis spicigera) | -- | -- | -- |
| ७२. | -- | -- | (१३) कदम ((Anthocephalus cadamba) | -- | -- |
| ७३. | -- | -- | (२३) रोहन (Soymida fabrifuga) | -- | -- |
| ७४. | -- | -- | (३२) टून (Cedrela toona) | -- | -- |
| ७५. | -- | -- | (४५) जांभा (Xylia xylocarpa) | -- | -- |
| ७६. | -- | (२) अंजन (Hardwickia binata) | (३) अंजन (Hardwickia binata) | (१२) अजन (Hardwickia binata) | -- |
| ७७. | -- | (२९) काजरा (Strychnes nuxvomica | -- | (२०) काजरां (Strychnes nuxvomica) | सिंधुदुर्ग जिल्ह्याकरीता अतिरिक्त अनुसूचित प्रजाती |
| ७८. | -- | -- | -- | (११) किंजळ किंवा किडळ (Terminalia Peniculata) | -- |
| ७९. | -- | -- | -- | (१४) खारफुटी (Mangrove) | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८०. | -- | -- | -- | (२५) अमृता (नरक्या) (Nothopodytes nimmoniana/ | -- |
| ८१ | -- | -- | -- | (२२) घेटस (Euginia zeylanica) | सिंधुदुर्ग जिल्ह्याकरीता अतिरिक्त अनुसूचित प्रजाती |
| एकुण | ६२ | ४९ | ३८ | -- | -- |
| **वाहतुक परवाण्यापासून सुट असलेली प्रजाती** | | | | | |
| १. | (८) बांबु *Bambusa vulgaris*, | (११) बांबु *Bambusa vulgaris*, | (५) बांबु *Bambusa vulgaris*, | -- | -- |
| २. | --- | (६०) वेडी बाभुळ | (४) बाभुळ | -- | -- |
| ३. | | (८) भेंडी (*Thespesia populanea*)-- | --- | -- | -- |
| **एकूण** | १ | ३ | २ | -- | -- |
| **एकंदर** | ६३ | ५२ | ४० | २२ | -- |

टिप्पणी:

१. सर्व प्रजाती समोर लिहिलेले क्रमांक हे संबंधीत अधिसुचनेतील अनुक्रम क्रमांक आहे.

२. अधिसुचनेनुसार कोकण प्रदेशातील ३ वृक्ष प्रजाती (किन्ही (३६), लोखंडी (४०) व शिंदी (५६)) मराठावाडा प्रदेशातून ८ वृक्ष प्रजाती (किन्ही (३४), लोखंडी (३८) , शिंदी (५३), हिवर (२६), कासिद (२८), महारुख (४०), सालई (४८) व सिताफळ (५६)) विदर्भ प्रदेशातील ५ वृक्ष प्रजाती (शिंदी (४४), सालई (२६), सिताफळ (२९), भिरा (३७) व पाम (४३)) वाहतुक परवाना मुक्त करणेस्तव प्रस्तावित आहेत व याचा एकत्रित विचार केल्यास सदरील वृक्ष प्रजाती १० होतात.

## प्रपत्र -३

### राखीव वृक्ष प्रजाती पैकी वाहतुक परवान्यापासून सुट देण्याचे दृष्टीने वगळलेल्या वृक्ष प्रजातींची यादी

| अ.क्र. | कोकण प्रदेश | मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र | विदर्भ प्रदेश | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | (३६) किन्ही (Albizia procera) | (३४) किन्ही (Albizia procera) | -- | -- |
| २. | (४०)लोखंडी (Ixora nigricuns) | (३८) लोखंडी (Ixora nigricuns) | -- | -- |
| ३. | (५६) शिंदी (Phoenix sylvestrix) | (५३) शिंदी (Phoenix sylvestrix) | (४४) शिंदी (Phoenix sylvestrix) | -- |
| ४. | -- | (२६) हिवर (Acacia leucophloea) | -- | -- |
| ५. | -- | (२८)कासींद (Cassia siamea) | -- | -- |
| ६. | -- | (४०) महारुख (Ailanthus excels) | -- | -- |
| ७. | -- | (४८) सालई (Boswellia serrata) | (२६) सालई (Boswellia serrata) | -- |
| ८. | -- | (५६) सिताफळ (Annona squamosa) | (२९) सिताफळ (Annona squamosa) | -- |
| ९. | -- | -- | (३७) भिरा (chlarorlon | -- |
| १०. | -- | -- | (४३) पाम (perennial lianas) | -- |

### वाहतुक परवाण्यापासून यापुर्वीच सुट असलेली प्रजाती

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | (८) बांबु *Bambusa vulgaris* | (११) बांबु *Bambusa vulgaris* | (५) बांबु *Bambusa vulgaris*, | -- |
| २ | -- | (६०) वेडी बाभूळ | (४) बाभुळ | -- |
| ३ | | (८) भेंडी (*Thespesia populanea*)-- | -- | -- |

# प्रपत्र-४

## संरक्षण मिळण्याच्या दृष्टिने वाहतुक परवाना आवश्यक करणे बाबत

## वृक्षाची यादी.

| र.क्र. | १ |
|---|---|
| १. | *ऐन (Terminalia tomentosa) |
| २. | *आंबा (Mangifera indica) |
| ३. | *बिजा (Pterocarpus marsupium) |
| ४. | *हळदू (Adina cordifolia) |
| ५. | *हिरडा (Terminalia chebula) |
| ६. | *जांभूळ (Syzijium cumini) |
| ७. | *खैर (Acacia catechu) |
| ८. | *महुआ, म्हावरा किंवा महु (Madhuka latifolia) |
| ९. | *साग (Tectona grandis) |
| १०. | *तिवस (Ougeinia dalbergioides) |
| ११. | *चंदन (Santalum album) |
| १२. | *अंजन (Hardwickia binata) |
| १३. | *अर्जुनसादडा (Terminalia arjuna) |
| १४. | *बेहळा (Terminalia belerica) |
| १५. | *नाना (Lagerstroemia lanceolata) |
| १६. | *शिशम (Dalbergia latifolia) |
| १७. | *शिवण (Gmelina arboria) |
| १८. | *काजरा (Strychnes nuxvomica) |
| १९. | *किंजळ किंवा किंडळ (Terminalia Peniculata) |
| २०. | *खारफुटी (Mangrove) |
| २१. | *अमृता (नरक्या) (Nothopodytes nimmoniana/ |
| २२ | *भेडस (Euginia zeylanica) |
| २३. | अल किंवा अशी (Moringa tectoriea) |
| २४. | आपटा (Bohinca recimosa) |
| २५. | असाना (Bridelia rectusa) |
| २६. | आवळा (Filethus eamblica) |
| २७. | बेल (Egal marmalous) |
| २८. | बाहावा (Cassiea fistula) |
| २९. | भोकर (शेलुटे) (Cardiea mixa) |
| ३०. | भोर (जांभुळ) (Amaniea becifara) |
| ३१. | बिबा (Semicarpus anacardium) |
| ३२. | बोर (Zizifus zuzuba) |
| ३३. | चारोळी (Buchaniea letifoliea) |

| | |
|---|---|
| ३४ | चंरा (Erinocarpus nimmoni) |
| ३५ | चिंच (Tamarindus) |
| ३६. | धामण (Grivica Telifonica) |
| ३७. | धावडा (Anogassius telifolica) |
| ३८. | डिकमाली Gardenia leucida |
| ३९. | घाटबोर (Zigifus Zilofara) |
| ४०. | तांबा (Zailiea zailocarfus) |
| ४१. | कळंब (Stepegaini parvifolica ) |
| ४२ | कंडाल (कडई) (Stereuliea urenes) |
| ४३. | करंज (Poganiea glebar) |
| ४४. | काजू (Anacardium oxidental) |
| ४५. | कवठ (Feroniea alefunt) |
| ४६. | खरसिंग (Stereospermum xylocarpum) |
| ४७. | खवस_ (*Sterculia colorata*) |
| ४८. | कोकम (रातांम्बी) (Garcinia indica) |
| ४९. | कुसुम (कोसिंब) Schleichera oleosa |
| ५०. | कुरा (*Ixora parviflora*) |
| ५१. | मोखा (Schrebera swietenioides) |
| ५२ | नन्द्रुक (Ficus retusa) |
| ५३. | पळस (Butea frondosa (syn. Butea monosperma) |
| ५४. | पांढरा खैर (कांती) (Acacia feruginea) |
| ५५. | पांगारा (Erythrina indica) |
| ५६. | फासी (Dalbergia paniculata) |
| ५७. | रक्तरोहीडा (Maha nigrescene) |
| ५८. | रिठा (Sapindus emarginata) |
| ५९. | सावर (Bombax malabarica / ceiba) |
| ६०. | शेमट (Oduba wodier syn. Lannea coromandelica) |
| ६१. | सोनखैर (लाल) (Acacia siamia) |
| ६२. | शेंद्रि किंवा कमला (Mellotus phillipinensis) |
| ६३. | टेंभूर्णि (तेंदु) (Diospyroa melanoxylon) |
| ६४. | तेंदू (Oroxylum indicum) |
| ६५. | ताडी प्लंट (Borasus flabellifer) |
| ६६. | ऊंबर (Ficus racemosa (syn. Ficus glomerata) |
| ६७. | वड (Ficus benghalensis) |
| ६८. | फणस (Artocarpus integrifolia) |
| ६९. | गोरख चिंच (Adansonia digitata) |
| ७०. | हिंगन (Balanities roxburghii) |
| ७१. | कांचन (Bauhinia malabarica) |
| ७२. | कुंभा (Careya arborea) |

| | |
|---|---|
| ७३. | मेडशिंग (Dolichandrone falçuta) |
| ७४. | मुरमाटी (Acacia emburnea) |
| ७५. | कडुलिंब (Azadirachta indica,) |
| ७६. | पिंपळ (Ficus religiosa) |
| ७७. | शमी (Prosopis spicigera) |
| ७८. | कदम ((Anthocephalus cadamba) |
| ७९. | रोहन (Soymida fabrifuga) |
| ८०. | तून (Cedrela toona) |
| ८१. | जांभा (xylia xylocarpa) |
| **एकूण** | ८१ |

**खुलासा**

१. * अशी खुण लावण्यात आलेली प्रजाती अनुसुचित प्रजाती आहे.

२. खुण विरहित प्रजाती अनुसूचित प्रजाती व्यतिरिक्त राखीव प्रजाती आहे.